**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
**क्रिडा विभाग**
**जाहिर सुचना**

ठाणे महानगरपालिकेच्या प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाकरिता जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमणुक करणेकरिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाकरिता कंत्राटी पद्धतीने मानधनावर जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची तात्पुरत्या स्वरुपात ०४ महिन्याकरिता नेमणुक करण्यासाठी खालील अटी/शर्तीस अधीन राहुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी/शर्ती**

१) प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाकरिता मान्सून कालावधीत ०४ महिन्यांकरिता २४x७ कामा करण्यासाठी प्रत्येक सत्रात ०२ या प्रमाणे ०३ सत्रात ०६ जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची निवड करण्यात येईल.

२) सदरच्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची नावे निश्चित करतांना अटी/शर्ती नुसार त्यांची पात्रता/अनुभव व सदर कामाकरिता आवश्यक असलेले प्रमाणपत्र या नुसार प्राधान्य देण्यात येईल.

३) नदी, खाडी, ओढा,समुद्र या वाहत्या पाण्याच्या स्त्रोतामध्ये पोहण्याचा कमीत कमी २ वर्षे अनुभव असणे आवश्यक आहे.

४) उमेदवार शारिरीक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक आहे. त्याबदल त्याने MBBS डॉक्टरचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५) निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांना प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन विभागाने नेमून दिलेल्या वेळेत घेण्याकरिता उपस्थित राहणे आवश्यक असेल.

६) उमेदवाराने वयाची १८ वर्ष पूर्ण व ३३ वर्ष वयाच्या आतील असणे आवश्यक आहे.

७) जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची कार्यालयीन वेळ तीन सत्रामध्ये (२४x७) अशी असेल.

८) सदरची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात ०४ महिन्याकरिता असेल.

९) निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांना प्रती महीना **रू.१५,०००/-** या प्रमाणे ठोक मासिक मानधन अदा करण्यात येईल.

१०) साप्ताहिक सुट्टी व्यतिरिक्त आपणांस कोणताही भत्ता, कायमपणाचे कोणतेही फायदे तसेच कोणत्याही प्रकारच्या रजेचा लाभ घेता येणार नाही.

११) निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांना मासिक मानधन व्यतिरिक्त महापालिकेच्या नियमित कर्मचाऱ्याप्रमाणे इतर कोणतेही हक्क, अधिकार लाभ, मिळणार नाहीत.

१२) प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे कामकरित असताना जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांना दुखापत झाल्यास त्यावरीत उपचार ठाणे महानगरपालिका रूग्णालयात मोफत करण्यात येईल.

१३) उपरोक्त प्रमाणे अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराच्या कागदपत्रांची छाननी करून पात्र उमेदवाराच्या ठाणे महानगरपालिकेच्या तरणतलाव विभाग व आपत्ती व्यवस्थापन विभाग यांनी नियुक्त केलेल्या निवड समिती मार्फत प्रात्यक्षिक निवड चाचणी घेण्यात येईल. त्या मधुन अंतिम जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची निवड करण्यात येईल.

१४)जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची नियुक्ती शासनाने सुचीत केल्या प्रमाणे विहित नियमानुसार करार पध्दतीने असतील त्यांना सेवेत कायमस्वरुपी करण्यासाठी दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

१५)सदर पदासाठी ०४ महिन्याकरिता कंत्राटी पद्धतीने मानधनावर नेमणुकीकरिता पात्र उमेदवारास उपरोक्त अटी/शर्ती नुसार रू.५०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा सादर करणे बंधनकारक आहे.

१६)निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक जर अपेक्षित कामगिरी करत नसल्यास त्यांचा करारनामा रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो। यांना असतील.

१७)सदरचे अर्ज दि.२१/०७/२०२३ पासुन दि.२७/०७/२०२३ पर्यंत स्विकारण्यात येतील, मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

उपरोक्त प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांनी जलतरण संबंधित अटी/शर्ती नमुद केलेल्या प्रमापत्राच्या प्रमाणित छायांकित प्रतीसह खालील पत्यावर अर्ज सादर करावेत.

अर्ज करताना बंद लिफाफ्यावर "जलनिर्देशक/जलजिवरक्षक म्हणुन नेमणुक करणेकरिता" त्या बाबत ठळक अक्षरात नमुद करावे.

**अर्ज करण्याचा कार्यालयाचा पत्ता:-**

**नागरी सुविधा केंन्द्र,**
**तळ मजला, प्रशासकिय भवन,**
**ठाणे महानगरपालिका, (मुख्यालय),**
**चंदनवाडी, पांचपाखाडी,**
**ठाणे. (प) ४००६०१**

सही /-
(मिनल पालांडे)
प्र-उप आयुक्त (क्रिडा)
ठाणे महानगरपालिका, ठाणे